आ०क्र. ४ शि०शि० मंडळ ८८-८८
दिनांक १०।८।८८

४

महाराष्ट्र शासन

क्रमांक:व्हीएलएस १०८७/(सीआर-३२८१)प्राशि३
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३ ऑगस्ट ~~जुलै~~, १९८७

प्रति,
सचिव
शिवभूमी शिक्षण मंडळ, खेड शिवापूर,
ता० हवेली, जि. पुणे.

विषय :- शिवभूमी विद्यालय
प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याबाबत.

महोदय,

वरील विषयासंबंधी लिहिलेल्या पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस . यमुनानगर निगडी, पुणे या ठिकाणी जून १९८७ पासून इयत्ता १ ते ४ वी च्या वर्गासहित मराठी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचे योग्य ते आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांना देण्यात आले आहेत. पुढील कार्यवाहीसाठी आपण कृपया त्यांच्याशी परस्पर संपर्क साधावा.

आपला विश्वासू,

(व. ल. फातरपेकर.)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

जिल्हा – पुणे–

| संस्थेचे /शाळेचे नांव | ठिकाण व तालुका | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १] पीपल्स एज्यु. सोसा. मुंबई इंग्रजी माध्यम प्रा. शाळा | येरवडा, पुणे–६ | इंग्रजी | १ ते २री |
| २. जनता शिक्षण संस्था पुणे ग्लॉसिन इंग्लिश मिडीयम स्कूल | दापोडी पुणे–१२ | इंग्रजी | १ ते २री |
| ३] डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे–४ | पुणे–४ | इंग्रजी | १ ते ४थी |
| ४] शिवभूमी शिक्षण संस्था, खेड शिवापूर, शिवभूमी विद्यालय. | यमुनानगर निगडी, पुणे. | मराठी | १ ते ५वी |
| ५] विकास तरुण मंडळ विकास विद्यामंदीर | मोहननगर चिंचवड | मराठी | १ ते ३री |
| ६] सरस्वती शिक्षक संस्था, तळेगाव दाभाडे, सरस्वती, विद्यामंदीर | तळेगांव | मराठी | १ ते ३री |
| ७] माऊंट सेंट ॲन, तळेगांव, दाभाडे माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट स्कूल | तळेगांव दाभाडे | इंग्रजी | १ ते ३री |
| ८] सेंट झेवियर एज्यु. ट्रस्ट, पुणे सेंट झेवियर इंग्लिश मिडियम स्कूल. | चिंचवड | इंग्रजी | १ ते २ री |
| ९] श्री. शिवाजी मराठा सोसायटी पुणे. श्री शिवाजी मराठा प्रा. शाळा | [illegible] पुणे. | मराठी | १ ली |
| १०] आचार्य श्री. विजय वल्लभ राजस्थानी, जैन विद्या प्रसारक मंडळ, पुणे विजय वल्लभ स्कूल | पुणे | इंग्रजी | [illegible] ली |

अत्यंत तातडीचे.

६
Page-1

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
शिक्षण विभाग,
जा.क्र.शिक्षण/प्राथ/२/७३०/८७
पुणे-१, दिनांक १८/८/१९८७.

प्रति,

मा.जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
पुणे.

विषय :- शासकीय परवानगी नसलेल्या खाजगी प्राथ.शाळांची माहिती.

महोदय,

या कार्यालयाने जा.क्र.शिक्षण/प्राथ/२/७२७/८७ अन्वये पुणे जिल्ह्यातील ज्या खाजगी प्राथ.शाळा अनधिकृतपणे चालू आहेत. त्याची यादी प्रसिध्दीसाठी दिली होती. परंतु शासनाकडील पत्र क्र.शिक्षण व सेवायोजन विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.व्हीएलएस/१०८७/३२६१/प्राशि/३/८७, दि.२०.७.८७ अन्वये खालील प्राथ.शाळांना मंजूरी दिलेली आहे. तरी खालील प्राथ.शाळांना मंजूरी आली असल्याने सदरच्या शाळा अधिकृत शाळा समजण्यात याव्यात व याबाबत प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | संस्थेचे नांव | माध्यम | वर्ग-इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १] | माऊंट सेंट ॲन कॉन्व्हेंट स्कूल, तळेगांव-दाभाडे. | दि सोसायटी ऑफ सिस्टर्स, मुंबई. | इंग्रजी | १ ते ४ |
| २] | शिवभूमी विद्यालय, यमुनानगर, निगडी.पुणे. | शिवभूमी शिक्षण मंडळ, खेड शिवापूर. | मराठी | १ ते ५ |
| ३] | विकास विद्यामंदीर, विकास तरुण मंडळ, चिंचवड. | विकास तरुण मंडळ, मोहननगर, चिंचवड. | मराठी. | १ ते ३ |
| ४] | जनता शिक्षण संस्था, दापोडी. | पुणे ब्लॉसम इंग्लीश मिडीयम स्कूल. | ~~मराठी~~ इंग्रजी | १ ते २ |
| ५] | वनाज परिवार शिक्षण मंडळ, पुणे. | वनाज परिवार शिक्षण मंडळ, कोथरुड. | मराठी. | १ ते ३ |
| ६] | आचार्य श्री वल्लभ राजस्थानी जैन-विद्या प्रसारक मंडळ, भवानी पेठ, पुणे. | आचार्य श्री.वल्लभ राजस्थानी जैन प्रसारक. | इंग्रजी | लो. |
| ७] | डेक्कन एज्यु.सोसा.पुणे. | डेक्कन एज्यु.सोसा. | इंग्रजी. | १ ते ४ |
| ८] | पिपल्स एज्यु.सोसायटी, मुंबई. | पी.ई.एज्यु.स्कूल.येरवडा पुणे. | इंग्रजी. | १ ते २ |

तरी वरील शाळा ह्या अधिकृत शाळा असल्याबाबत प्रसिध्दी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासु,
(सही)
शिक्षणाधिकारी, (प्र)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

OC signed by
E.O.

[क्र.मागे पहावे..२]

वाचले : 1) मुख्याध्यापक शिवभूमी विद्यालय, यमुनानगर, निगडी, प्राधि. पुणे 44 या शाळेतील इ. 6 वी च्या वर्गात नैसर्गिक वाढीनुसार मान्यता देणेबाबतच्या विनंती अर्ज दि. 11/9/87.

2) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे 1 याचे कडील पत्र जा.क्र. प्राशि/मान्यता पी. आर. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे 1 दि. 4/8/87.

---

शिक्षण मंडळ कार्यालय,
क्र. शि/कावि/9/ 6 /89.
दि. 4/5/89.

आदेश :

विषय : इ.6 वी च्या वर्गास नैसर्गिक वाढीनुसार परवानगी देणेबाबत.

शासनाने खास बाब म्हणून वरील संदर्भिय क्र. 2 अन्वये आपल्या प्राथ. शाळेला मान्यता दिलेली असून सदर मान्यता आदेशात घातलेल्या अटींना अधिन राहून तसेच खालील अटीवर नैसर्गिक वाढीनुसार इ.6 वी च्या वर्गाला जुन 1988 पासून मान्यता देण्यात येत आहे. अटींची पूर्तता न केल्यास वर्गाला दिलेली मानयता काढून घेतली जाईल.

1) शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार फी घ्यावी.

2) जादा वयाच्या शिक्षकांची वयोमर्यादा मा. शिक्षण उपसंचालक पुणे यांच्या कडून क्षमापित करून घ्यावी.

3) शासनाच्या नियमाप्रमाणेच शिक्षक भरती करावी.

4) नमुना नं. 1,4,5, ही रजिस्टर अद्यावत ठेवावीत. व त्यातील नोंदी बिनचूक असाव्यात

5) शिक्षकांना शासनाच्या नियमानुसारच पगार देणेत यावा व वर्गातील विद्यार्थी संख्या शासननियमानुसार निर्धारित ठेवावी.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 18.

प्रत माहितीसाठी :
मुख्याध्यापिका,
शिवभूमी विद्यालय,

1। मुख्याध्यापक शिवभूमी विद्यालय, यमुनानगर, निगडी, प्राधिकरण, पुणे 44 या शाळेतील इ. 7 वीच्या वर्गात नैसर्गिक वाढीनुसार मान्यता देणेबाबतच्या विनंती अर्ज. दिनांक 14/12/89.

2। मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे 1 यांचेकडील पत्र क्र. प्राशि/मान्यता पी.आर. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे 1, दि. 4/8/87.

---

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
क्र. शि/कावि/916/89,
दिनांक 4/5/89.

आदेश :-

विषय : इ. 7 वीच्या वर्गास नैसर्गिकवाढीनुसार परवानगी देणे बाबत.

---

शासनाने खास बाब म्हणून वरील संदर्भीय क्र. 2 अन्वये आपल्या प्राथमिक शाळेला मान्यता दिलेली असून सदर मान्यता आदेशात घातलेल्या अटींना अधिन राहून तसेच खालील अटीवर नैसर्गिक वाढीनुसार इ. 7 वीच्या वर्गाला जून 1989 पासून मान्यता देण्यात येत आहे. अटींचा पूर्तता न केल्यास वर्गाला दिलेली मान्यता काढून घेतली जाईल.

1। शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार फी घ्यावी.

2। जादा वयाच्या शिक्षकांची वयोमर्यादा मा. शिक्षण उपसंचालक पुणे यांच्या कडून क्षमापित करून घ्यावी.

3। शासनाच्या नियमाप्रमाणेच शिक्षक भरती करावी.

4। नमुना नं. 1, 4, 5 ही रजिस्टर अद्यावत ठेवावीत व त्यातील नोंद बिनचूक असाव्यात.

5। शिक्षकांना शासनाच्या नियमानुसारच पगार देण्यात यावा व वर्गातील विद्यार्थी संख्या शासननियमानुसार निर्धारित ठेवावी.

(सही)

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 18.

प्रत :- माहितीसाठी
मुख्याध्यापिका
शिवभूमी विद्यालय.